**<u>उलटतपास जाबदेणार यांचेतर्फे विधिज्ञ श्री. ए.व्ही. पाटील यांच्या मार्फत शपथेवर सुरु .......</u>**

१२. मी आज रोजी जाबदेणार यांचेकडे कामावर आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, मला दि. ०१.०६.२०२० रोजी निलंबीत केले. हे म्हणणे बरोबर आहे की, चौकशी मुळे मला निलंबीत केले होते. हे म्हणणे बरोबर आहे की, मला दि. ०३.१२.२०१९ रोजचीं आरोपपत्र देवुन चौकशी करण्यात आली व त्यानंतर मला ०४ दिवसांची निलंबनाची शिक्षा देण्यात आली. हे म्हणणे बरोबर आहे की, मला शिक्षा म्हणून दिलेली ०४ दिवसांचे निलंबन मी या तक्रारीमध्ये अव्हानीत केले आहे.

१३. श्रीमती माया बेद या जाबदेणार यांचेकडे नोकरीला होते व त्या सध्या सेवानिवृत्त झालेले आहेत. हे म्हणणे बरोबर आहे की, मी व श्रीमती माया बेद या व इतर कर्मचारी हे कामगार यांचे निवासस्थानचे कॉलनीमध्ये राहत होते. हे म्हणणे बरोबर आहे की, माझेवर केलेल्या आरोपपत्रामधील घटना ही दि. १७.११.२०१९ रोजीची आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, माझेवरील केलेले आरोप चौकशीमध्ये सिध्द झाल्याचे अहवालावर आधारीत मला ०४ दिवस निलंबनाची शिक्षा देण्यात आली. याबाबत दोघांनी पोलिस स्टेशन येथे तक्रार दिलेली होती. हे म्हणणे बरोबर नाही की, श्रीमती माया बेद यांनी दिलेली पोलिस तक्रार मागे घेण्यासाठी मी त्यांना भाग पाडले. साक्षीदार स्वतः सांगतात की, आम्ही दोघांनी एकमेका विरुध्द केलेली पोलिस तक्रार मागे घेतली.

१४. हे म्हणणे बरोबर नाही की, माझेवर केलेले आरोप चौकशीमध्ये सिध्द झालेने त्याचा विचार करुन जाबदेणार यांनी मला योग्य व कायदेशीर ०४ दिवस निलंबनाची शिक्षा दिलेली आहे.

१७. दि. २९.०६.२०१२ रोजी दिलेली शिक्षा मी कोणत्याही न्यायालयामध्ये अव्हानीत केलेली नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, दि. १८.०७.२०१२ रोजी काही पोलिस मला ताब्यात घेण्यासाठी जाबदेणार कंपनीचे परीसरात आले होते. हे म्हणणे बरोबर आहे की, मला याची चाहूल लागल्यानंतर मी दुस-या गेट मधुन पळून गेलो. हे म्हणणे बरोबर आहे की, त्यांनतर दि. १८.०७.२०२२ ते दि. २८.०७.२०२२ या कालावधीकरीता मी रजेचे अर्ज दिलेले नाही व मी गैरहजर होतो. साक्षीदार स्वतः सांगतो की, त्याची तोंडी कल्पना मी जाबदेणार यांना दिलेली होती. हे म्हणणे बरोबर आहे की, या घटनेबाबत मला जाबदेणार यांनी दि. ०४.०६.२०१२ रोजी कारणे दाखवा नोटीस दिलेली होती. हे म्हणणे बरोबर नाही की, याबाबतीत माझी चुक झाली असे मी जाबदेणार यांना दि. १०.०६.२०१२ रोजी पत्र दिले आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, त्यावेळेला मला शिक्षा म्हणून ०२ दिवसां साठी निलंबीत करण्यात आले होते. हे म्हणणे बरोबर आहे की, मी सन २०१२ नंतर माझे निलंबानाचे आदेश न्यायालयामध्ये अव्हानीत केले नाही. सदरचे अव्हान मी या तक्रारीमध्ये केलेले आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, सन २०१२ मध्ये प्रातिनीधीक संघटनेच्या मध्यस्थीने मला सौम्य शिक्षा देण्यात आली होती.

१६. हे म्हणणे बरोबर आहे की, मला दि. ११.०६.२०१८ रोजी कारणे दाखवा नोटीस दिलेली होती व त्यामध्ये माझेवर आरोप करण्यात आले होते. हे म्हणणे बरोबर आहे की, दि. २६.०७.२०१७ रोजी माझी रात्रपाळी होती. हे म्हणणे बरोबर आहे की, मला दि. ०२.०८.२०१७ रोजी कारणे दाखवा नोटीस दिलेली होती व त्याला मी दि. ०४.०८.२०१७ रोजी खुलासा सादर केलेला आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, त्यावेळेला मला दोन दिवसांची निलंबनाची शिक्षा देण्यात आलेली होती. हे म्हणणे बरोबर आहे की, त्यावेळेला सदरचे निलंबन मी अव्हानीत केले नव्हते व या तक्रारीमध्ये अव्हानीत केलेले आहे.

१७. हे म्हणणे बरोबर आहे की, चितळी डिस्टीलरी ही महाराष्ट्र शासनाचे अंगीकृत होती व ती सन २००८ मध्ये जाबदेणार क्र. १ यांनी विकत घेतली होती व त्यानंतर सध्या सन

२०२० मध्ये जाबदेणार क्र. २ यांनी विकत घेतलेली आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, चितळी डिस्टीलरी ज्यावेळेला जाबदेणार क्र. १ यांनी विकत घेतली त्यावेळेला चितळी डिस्टीलरीनी दिलेले यादी प्रमाणे त्यांचेकडील सर्व कामगार जाबदेणार क्र. १ यांचेकडे वर्ग करण्यात आले होते व त्यामध्ये मलाही वर्ग केले होते. हे म्हणणे बरोबर आहे की, सन २००८ ते २०१० हा कालावधी जाबदेणार कंपनीचे देखभाल व दुरुस्तीमध्ये गेला. मी या कालावधीमध्ये ज्यादा काम केलेले आहे हे दाखविण्यासाठी कागदोपत्री पुरावा या प्रकरणात दाखल केलेला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, सन २००८ ते २०१० या कालावधीचे ज्यादा कामाचा पगार मी पहिल्यांदा या तक्रारीमध्ये मागीतलेला आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, मला ज्यादा कामाचा पगार जुन-२०१८ चे पगाराबरोबर देण्यात आला आहे. मी २०० तास ज्यादा काम केले बाबत पुरावा या तक्रारीमध्ये दाखल नाही.

१८. हे म्हणणे बरोबर आहे की, सन २००८ पर्यंत जाबदेणार कंपनी ही शासन अंगीकृत होती व त्यांनतर ती खाजगी कंपनी झाली. हे म्हणणे बरोबर आहे की, खाजगी कंपनी झाल्यानंतरही दोन ते तिन वर्षा पर्यंत पुर्वीचे सेवाशर्ती राहतील असे ठरलेले होते. हे म्हणणे बरोबर आहे की, त्यांनतर सन २०१० सालापासुन कामगारांचे सेवा शर्ती बाबत संघटनेबरोबर करार करण्यात आले होते. हे म्हणणे बरोबर आहे की, संघटनेबरोबर झालेल्या कराराचे फायदे सर्व कर्मचा-यांना देण्यात आले. हे म्हणणे बरोबर आहे की, करारामध्ये ठरल्याप्रमाणे मला वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती करण्यात आली.

१९. माझे लग्न सन २००२ मध्ये झाले होते. परंतु, नंतर फारकत झाले व पुन्हा दुसरे लग्न सन २००४ मध्ये झाले व दुस-या लग्नाची फारकत झाली नाही. सध्या मी अन्य महिला बरोबर राहत आहे, ज्याला मी पत्नीचा दर्जा दिलेला आहे. मला दोन मुले अन्य महिला कडून आहेत व पहिल्या पत्नीकडून एक मुलगा व एक मुलगी आहे. परंतु ते माझे बरोबर राहत नाहीत. माझेकडे दोन्ही पत्नींबरोबर लग्न केलेबाबत लग्नाचा दाखला नाही. हे म्हणणे बरोबर

आहे की, निर्मला विटकर ही माझी दुसरी पत्नी आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, माझे विरोधात श्रीरामपुर न्यायालयामध्ये ४९८ कलमाखाली प्रकरण दाखल आहे व तसेच कल्याण न्यायालयामध्ये प्रकरण चालु आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, माझे कोणतेही लग्न व मुल अधिकृत नसल्याने मला शैक्षणीक आणि वैदयकिय खर्चाचे परताव्यासाठी मी पात्र नाही.

२०. हे म्हणणे बरोबर आहे की, माझे वडील हयात नाही व माझी आई माझे बरोबर राहत नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, माझी आई माझे बरोबर राहत असतांना मला वैदयकिय भत्ता मिळालेला आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, माझे पुर्व सेवा रेकॉर्ड हा कलंबीत आहे. हे म्हणणे बरोबर नाही की, मी श्रीमती माया वेद यांचेवर दबाव आणून माझे विरुध्द केलेली तक्रार मागे घेण्यास भाग पाडले. हे म्हणणे बरोबर नाही की, मी प्रतिज्ञापत्रामध्ये केलेली सर्व कथने खोटी व चुकीची आहेत. हे म्हणणे बरोबर नाही की, मी खोटी तक्रार दाखल केलेली आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काहीनाही.**

माझ्या समक्ष,

**सही/-**
(समीना खान)
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, अहमदनगर.

दिनांक :- ०६.०८.२०२६.